भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ )

जा.क्र. ८१६/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १३/१२/२०१६

**१) संगनमत करून अल्पवयीन मुलीला पळवुन नेल्याने गुन्हा नोंद. :–**

दिनांक ११/१२/२०१६ रोजी १६.०० वा. दर. यातील फिर्यादीची पीडीत अल्पवयीन मुलगी हीला आरोपी क्र. २ ने आपले घरी ठेवुन पीडीत मुलीस त्याचे घरून एका मोटार सायकलवर आरोपी क्र. १ याने बसऊन व दुस–या मोटार सायकलवर आरोपी क्र. ३ ते ५ यांनी संगनमताने आरोपी क्र. १ यांनी पीडीत मुलीस पळवुन नेले आहे असे फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ३६३,३४ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनी .गांवडे पोलीस स्टेशन साकोली हे करीत आहेत.

**२) ऑर्डन्स फॅक्ट्री येथील कॉपर वायरची चोरी:–**

दिनांक ०५+०६/१२/२०१६ चे १६.०० चे रात्र दर. यातील जवाहरनगर ऑर्डन्स फॅक्ट्री कॉलोनी परीसरात पोल क्र. १३७ ते १४२ दरम्याणचे इलेक्ट्रीक पोल वरील कॉपर वायर अंदाजे २५० मिटर वजन २५ किलो कि. ५०००/–रू चा माल कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेल्याने फिर्यादी मनीषकांत सुर्यकांत जेहोआस वय ४५ वर्ष रा. जवाहरनगर कनिष्ठ कार्या. प्रबंधक जे.डब्ल्यु.एम. ऑर्डन्स फॅक्ट्री यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम ३७९ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. सार्वे. पोलीस स्टेशन जवाहनगर हे करीत आहेत.

**३) पिकअप गाडीने अल्टो गाडीला मागेहुन धडक मारू दोन जखमी केल्याने गुन्हा नोंद:–**

दिनांक १२/१२/२०१६ चे ११.१०. वा. दर. यातील फिर्यादी अमित भैयाजी रेहपाडे वय ३८ वर्ष रा. खापरी हा आपली अल्टो कार क्र. एमएच. ३९ डी ६१३७ ने निलज कडुन पवनी कडे येत असतांना फिर्यादीचे ३६/०११९ ही थांबली असता फिर्यादीने आपली कार सुध्दा ब्रेक दाबुन थांबवली परंतु यातील आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपने चालवुन कारचे मागुन धडक मारल्याने फिर्यादीचे कारचे समोरील बोनेट व डिक्की व फिर्यादीची मुलगी नेहालीका वय अंदाजे १० वर्ष व पुतण्या सोम वय १० वर्ष यांना जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादीचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पवनी येथे कलम २७९,३३७ भांदवि. सहकलम १८४ मोवाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा कटारे पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहेत.

**४) अवैध दारु अडयांवर धाडी . :–**

दिनांक १२/१२/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो. स्टे. आंधळगाव येथील अवैध दारू अडयांवर धाडी घालुन एकुण ०१ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ०१ लिटर ९८० मिली लिटर देशी दारु कि. ५५०/–रू. चा माल जप्त करण्यात आला आहे.

**५) मोटार वाहन कायद्याखाली कारवाई. :–**

दिनांक १२/१२/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायद्याखाली ४८ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी तिन सिटर वाहनांवरती ०३ केसेस व ईतर वाहनांवरती ४५ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

(बी. आर. गाडे)
प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र. ८८०५१०१११२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.